# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ०८.०६.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक ०८.०६.२०२६ चे ०९.०० वा. ते ११.२० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथक पोलीस हे पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, संघर्ष नगर, गल्ली क्र. ०३ समोर, बिडगाव रोडवर एका ॲक्टिवा मोपेडजवळ दोन संशयीत इसम आढळुन आल्याने, त्यांना थांबवुन, पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी आपले नांव, १) विजय नंदलाल रहांगडाले वय ४४ वर्षे रा. संघर्ष नगर, पंकज किराणा जवळ, वाठोडा रिंग रोड, भांडेवाडी, नागपूर २) शहबाज फिरोज शहा वय २७ वर्ष रा. महेश नगर, शिवमंदीर जवळ, गिट्टीखदान, नागपूर असे सांगीतले. आरोपी क्र. १ याचेवर यापुर्वी पोलीस ठाणे वाठोडा व नंदनवन येथे गुन्हे दाखल असल्याने, त्याचे जवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, त्यांची अंगझडती घेतली असता, आरोपी क्र. १ चे पॅन्टचे खिशात झिपलॉक पन्नीमध्ये एकुण ५२ ग्रॅम एम.डी. पावडर व ०२ मोबाईल फोन मिळुन आले. तसेच त्यांचे ताब्यातील पांढरे रंगाचे ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच ४९ बीएन ३३५१ च्या डिक्कीचे पाहणी केली असता, त्यामध्ये रोख २,२९,०००/— रुपये मिळून आले. आरोपींचे ताब्यातुन एम.डी. पावडर, रोख २,२९,०००/—रू., ०३ मोबाईल फोन, मोपेड गाडी असा एकुण ९,०४,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींची सखोल विचारपूस केली असता, त्यांनी त्याचा साथीदार पाहिजे आरोपी नामे सोहेल उर्फ भांजा शेख मुख्तार वय २३ वर्षे, रा. समोसा मैदान जवळ, मोठा ताजबाग, नागपुर याचेकडून आणल्याचे व रोख रक्कम एम.डी.पावडर विक्रीची असल्याचे सांगीतले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री—खरेदी करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(क), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे भांडेवाडी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. ०२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव भांडेवाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. गजानन गुल्हाने, पोउपनि. नागेश पुन्नावाड, पोहवा ज्ञानेश्वर भोगे,

गणेश जोगेकर, रत्नाकर कोठे, शेख इमरान, नितीन साळुंके, विवेक आढाव, पोअं. संतोष शेंद्र, नितीन राठोड, व मपोहवा अनुप यादव यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे गिट्टीखदान :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०७.०६.२०२६ चे २०.२६ वा. चे सुमारास, गिट्टीखदान पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, चिंतामण नगर, रमाई बुध्द विहाराजवळ एक इसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा ईसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी चाकु काढुन घेतला. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव राकेश धनराज राऊत वय ३३ वर्षे रा. दुर्गा मंदीर गल्ली, चिंतामण नगर, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु किंमती २००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे वाडी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०८.०६.२०२६ चे ११.५० वा. चे सुमारास, फिर्यादीचे पती नामे राहुल गणपतराव कोंडके वय ४५ वर्ष रा. सुधांशु महाराज मंदीर मागे, सुराबर्डी, वाडी, नागपूर हे त्याचे दुचाकी क्र. एमएच ४० डब्ल्यू ६७४६ ने पोलीस ठाणे वाडी हद्दीत, अमरावती—नागपूर हायवे रोड, ईश्वर लॉन समोरुन नागपूरकडे येत असता, निळया रंगाचे टिप्पर ट्रक क्र. एमएच ४० वाय ९५४१ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे पतीचे डिस्कव्हर मोटार सायकलला धडक देवुन गंभीर जखमी केले व घटनास्थळी वाहन सोडून पळून गेला. गंभीर जखमी फिर्यादीचे पती यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

यािप्रकरणी फिर्यादी श्रीमती वर्षा राहुल कोंडके वय ४१ वर्ष रा. सुधांशु महाराज मंदीर मागे, सुराबर्डी, वाडी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१,३२४(४) भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.क़ा. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## (अकस्मात मृत्यु)

**<u>पोलीस ठाणे कोराडी</u> :—** दिनांक ०८.०६.२०२६ चे ०६.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचे सासरे नामे अशोक माधवराव भडंग वय ६० वर्ष रा. कोराडी ग्रामपंचायत जवळ, कोराडी, नागपूर हे त्याचे मोपेड गाडी क्र. एमएच ४० सीव्ही ०५८६ ने त्यांचे सेक्युरिटी गार्डचे कामावरुन भरतवाडा येथून नागपूर—सावनेर रोडने परत येत असता, पोलीस ठाणे कोराडी हद्यीत, शेरे पंजाब हॉटेजजवळ, ओम शाम ट्रेडर्स समोर त्यांना चक्कर आल्याने ते स्वत:हा गाडीवरुन खाली पडल्याने त्यांचे डोक्याला मार लागून ते गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी प्रविण माणिकराव तट्टे वय ३५ वर्ष रा. ग्रामपंचायत जवळ, कोराडी, नागपूर यांचे सुचनेवरून पोलीस ठाणे कोराडी येथे पोउपनि भुरलाल चव्हाण यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

## (मिसिंग)

**१) <u>पोलीस ठाणे अजनी</u> :—** सौ. विशाखा राजेश वैद्य वय ३० वर्षे रा. गल्ली क्र. ५, श्रमजिवी नगर, अजनी, नागपूर ह्या दिनांक ०६.०६.२०२६ चे ११.०० वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा—गोज, बांधा—मजबुत, उंची— ५ फुट, केस— काळे लांब, अंगात— लाल रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**२) <u>पोलीस ठाणे कोतवाली</u> :—** प्रमोद शंकरराव घारपांडे वय ५६ वर्षे रा. देवतळे मोहल्ला, कल्याणेश्वर मंदीर जवळ, महाल, नागपूर हे दिनांक ०२.०६.२०२६ रोजी पोलीस ठाणे कोतवाली हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळाले नाही. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—लांब, बांधा—सडपातळ, उंची— ५ फुट, केस— काळे पांढरे, भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**३) <u>पोलीस ठाणे अजनी</u> :—** रविंद्र वसंतराव हिवाळे वय ४५ वर्षे रा. मु.पो. वाडी, ता. खामगाव, बुलठाणा हे दिनांक १८.०५.२०२६ चे ०७.०० वा. पासून पोलीस ठाणे अजनी हद्दीतील सुपर स्पेशालिटी हॉस्पिअल येथून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत गेले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे, अंगात पांढरा शर्ट व काळा फुलपॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.


सौ. विशाखा


प्रमोद


रविंद्र

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**